माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**दाखल झालेली तक्रार**

## रामाआ - तक्रार क्र. अम- ६३६/२०१३

तक्रारकर्ता श्री रविंद्र भिमरावजी कांडलकर
द्वारा श्री प्रदीपराव बोके,
सुरवाडी खुर्द, तिवसा ता.तिवसा जि.अमरावती

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
समाजकल्याण विभाग, अमरावती

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशीक उपायुक्त
समाजकल्याण विभाग, अमरावती

**तक्रार सुनावणी दिनांक - ३०/३/१७**

तक्रारकर्ता यांनी दि.१०/१२/१३ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ अन्वये तक्रार दाखल करुन तक्रार क्र.३३/२०१२ मध्ये पारीत आदेश दि.२१/५/१३ (निर्गमित दि.२६/६/१३) नूसार अनुपालन झाले नाही असे नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना सुनावणीसंबंधी रितसर सुचनापत्र काढून दि.३०/३/१७ रोजी सुनावणीकरीता बोलावले होते. सुनावणीस तक्रारकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे श्रीमती दीपा हेरोळे, विशेष अधिकारी वर्ग-२ (निवासी शाळा) हया हजर आहेत.

सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, अमरावती यांनी दि.३०/३/१७ अन्वये लेखी खुलासा सादर करुन नमुद केले आहे की, आयोगाच्या दि.२१/५/१३ च्या आदेशानूसार कार्यालयाचे दुरध्वनी संदेश दि.१७/३/१७ तसेच पत्र क्र.१३४६ दि.१७/३/१७ अन्वये अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत दि.२३/३/१७ पर्यंत हजर राहण्यास कळविले होते परंतु अर्जदार हजर झाले नाहीत. त्यामुळे कार्यालयाचे उपलब्ध अभिलेखावरुन अर्जदार यांना कार्यालयाचे पत्र क्र.१७२९ दि.२५/३/१७ अन्वये घरपोच पुरविण्यात आलेली आहे व माहिती प्राप्त झाल्याची अर्जदाराची पोच दि.२९/३/१७ सादर करण्यात आली आहे. अर्जदार यांनी एकुण ११६ झेरॉक्स प्रती मिळाल्याबाबत दि.२९/३/१७ रोजी पोच दिली असुन त्याची प्रत आयोगाकडे सादर करण्यात आली आहे. त्यामुळे माहितीची पुर्तता झालेली आहे.

आज सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांनी माहिती मिळाल्याचे कबुल केले तथापी आणखी काही निवडक कागदपत्रांच्या छायाप्रती त्यांना पाहिजे असल्याचे व त्याबाबत ते जन माहिती अधिकारी यांना यादी देणार असल्याचे सांगतात. तथापी जन माहिती अधिकारी यांचेकडे तक्रारकर्ता यांनी दि.२९/३/१७ रोजी मिळालेल्या माहितीव्यतिरिक्त आणखी पाहिजे असलेल्या काही निवडक

कागदपत्रांची यादी दिल्यानंतर सदर यादीनूसार मागितलेले कागदपत्र हे मुळ द्वितीय अपील क्र.९५२/२०१० मधील जोडपत्र-अ च्या अनुषंगाने आहेत की नाही हे जन माहिती अधिकारी यांनी तपासून घ्यावे व माहिती उपलब्ध असल्यास विनाशुल्क पुरवावी. सदर कागदपत्र उपलब्ध नसल्यास तक्रारकर्ता यांना तसे लेखी द्यावे.

**- आदेश -**

प्रस्तुतची तक्रार निकाली काढण्यात येते.

**(संभाजी सरकुंडे)**
**राज्य माहिती आयुक्त, अमरावती.**

जा.क्र.त.६३६/२०१३/३३०५ /२०१७, दिनांक- २१/५/१७

जिसकार/